हिंदुस्थान

## प्रियकरासमोरच तरुणीवर सामूहिक बलात्कार

नागपूर: प्रियकरासमोरच प्रेयसीवर पाच युवकांपैकी तिघांनी सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना कुहीतील खैरी भागात घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या १२ तासांच्या आत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सूत्रधारासह पाच नराधमांना अटक केली. सर्वांना कुही पोलिसांच्या ताब्यात दिले. सूत्रधार पंकज विलास कुथे (वय २२), आकाश गुलाबराव लेंडे (वय २६), सुनील ऊर्फ सुमित यशवंत गवळी (वय २७), सूरज बंडूजी मने (वय २२) व चंद्रशेखर रवींद्र कडव (वय १९,सर्व रा. कुही) ,अशी अटकेतील नराधमांची नावे आहेत.

# दुसऱ्या दिवशीही जिल्हा लॉकडाऊन जीवनावश्यक वस्तू विक्रेत्यालाच मुभा

(विश्वनाथ राऊत)

**वाशिम दि. २३ :** काय या कोरोना ने कहर केले कधी नाव न ऐकले आज तो कोरोना भलताच भारी भरत आहे. कोरोना या आजाराचे इतर देशात मोठे पडसाद पडले असले तरी भारतामध्ये त्याला सीमीत ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशाने त्या त्या राज्यातील सरकार व प्रशासन नागरीकांचे आरोग्य सुरक्षित राहावे यादृष्टीने काही कठोर निर्णय घेत असले तरी जनतेकडून त्याचे तेव्हढ्याच मोठ्या मनाने पालन होत आहे.



२२ मार्च ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनता कर्फ्यू चे निर्देश दिले होते आणि ते सर्वांनी त्याचे पालन केले. सायंकाळी ५ वाजता हातात जी वस्तु पडेल ती वाजवून कुठे शंखनाद तर कुठे थाळी, कुठे टाळी वाजविली. संपुर्ण देश या परिस्थितीचा सामना करण्यासाठी एकवटला असला तरी मात्र, कोरोना कहर करत आहे. बाहेर देशातून आलेला हा भयंकर आजार आता ग्रामीण भागापर्यंतही पोहचण्याचा प्रयत्न करत असला तरी त्याला रोखण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी १४४ कलम लागु करुन जमावबंदी लागु केली आहे. आज तर जिल्ह्याच्या सीमा बंदी करुन बाहेरच्या कुठल्याही वाहनाला जिल्ह्यात प्रवेश दिला जाणार नाही. आधी रेल्वे व एसटी बंद करण्यात आल्या. खासगी लक्झरी बंद झाल्या. मात्र, पुणे,मुंबईला गेलेली ग्रामीण भागातील मजुर व कंपनीतील कामगार हे गावाकडे लक्झरी च्या माध्यमयातून परतले.त्यात काहींना सर्दी,खोकला सारखे आजार असल्यामुळे काही ठिकाणी आरोग्य तपासणी झाली तर काही थेट आपल्या घरी गेले. त्यामुळे ग्रामीण भागात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शहरातही तीच अवस्था आहे. ग्रामीण भागातही या आजाराच्या भितीपोटी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून नागरिक घरामध्येच राहणे पसंत करत आहेत. काही नागरिकांनी शेतामधील गोठे चा आधार घेवून आपले कुटुंब शेतात वास्तव्य करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लाईन चालू ठेवावी. जेणेकरुन नागरिकाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे राहील. जिल्ह्यामध्ये आतापर्यंत कोरोना चा एकही रुग्ण आढळला नाही. हे जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असली तरी मात्र बाहेरुन येणाऱ्या लोंढे यांना निर्बंध लावणे तितकीच गरज आहे. या दृष्टीने जिल्हाधिकारी ऋषीकेश मोडक व त्यांच्या प्रशासनाने तशी कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक वसंत परदेशी, अपर पोलिस अधिक्षक विजयकुमार चव्हाण, सहायक पोलिस अधिक्षक डॉ. पवनकुमार बनसोड, त्या त्या उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभागीय अधिकारी, पोलिस निरिक्षक, शहर वाहतूक, जिल्हा वाहतूक सह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी व त्यांचे कर्मचारी, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य अधिकारी, आरोग्य विभागातील कर्मचारी ही सर्व यंत्रणा २४ तास जागते रहो चा पहारा देत आहे. आणि त्या दृष्टीने जिल्ह्यातील नागरिकांनी देखील प्रशासनाला सहकार्य करणे ही तितकीच त्यांची जबाबदारी आहे.

जिल्ह्यात १४४ कलम लागू (जमावबंदी आदेश) पाच पेक्षा जास्त नागरिकांनी कुठेही थांबु नाही. अत्यंत आवश्यक असल्यास तरच घराबाहेर पडावे, अशा परिस्थितीत जर पोलिसांनी हटकले तर त्यांना नम्रपणे आपण कुठे चाललो कुणाशी काम आहे, सांगुन पुढे जावे. हुज्जत घालू नाही. ते देखील आपल्या कुटुंबाची पर्वा न करता आपले नागरी बांधवाचे आरोग्य सुरक्षित राहीले पाहीजे यासाठी राज्य शासनाच्या निर्देशाने प्रशासन देखील महत्वाची जबाबदारी पार पडत आहेत. सुजान नागरिकांनी आपले व कुटुंबीयाचे, शेजाराचे आरोग्य कसे सुरक्षीत राहील आणि कोरोना या आजाराला हद्दपार कसे करता येईल, यासाठी एकजुटीने राहल्यास जिल्ह्यात या कोरोना चा शिरकाव होणार नाही हे तेवढेच खरे.

# रविनगर येथील श्री संकटमोचन हनुमान जन्मोत्सवातील सर्व धार्मिक कार्यक्रम रद्द

अमरावती दि. २३ : आपणास सुचित करण्यात येते की दरवर्षी श्री संकट मोचन हनुमान मंदिराचे हनुमान जन्मोत्सवा दरम्यान विविध कार्यक्रम आपण मोठ्या उत्साहात साजरे करत असतो ते सर्व कार्यक्रम जीवघेण्या कोरोना व्हायरसचा संसर्ग वाढत असल्यामूळे प्रभावित होत आहेत. या कार्यक्रमात भविकभक्त मोठ्यासंखेने उपस्थीत असतात त्यामूळे याठिकाणी विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता यावर उपाययोजना म्हणुन नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह निर्णय घेतला पाहिजे त्यासाठी संस्थानकडून शनिवार दि.२१/०३/२०२० ला विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये श्री हनुमान जन्मोत्सवातील सर्व कार्यक्रम रद्द केले पाहिजे व मंदिराचे प्रवेशद्वारही काही दिवसाकरिता भाविकांना दर्शनासाठी बंद केले पाहिजे असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे.

त्यामूळे आपणास सूचित करण्यात येते की दि.२५/०३/२०२० ते दि. ०८/०४/२०२० या दरम्यान संस्थान तर्फे आयोजीत केलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत तसेच दि. २२/०३/२०२० ते दि.३१/०३/२०२० पर्यंत मंदिराचे प्रवेशद्वार भाविकांना दर्शनासाठी बंद राहील असे आवाहन श्री संकट मोचन हनुमान मंदिर, रविनगर चे सचिव सचिन रासने यांनी कळविले आहे.



# कोरोना : जिल्ह्यातील ४९ जण होम कॉरेंटाईनच्या परिघाबाहेर

## विलगीकरण कक्षात तीन पॉझेटिव्ह रुग्णांसह एकूण सहा जण

**यवतमाळ, दि २३ :** जिल्ह्यात विविध ठिकाणी होम कॉरेंटाईन करण्यात आलेल्या नागरिकांची संख्या आज (दि.२३) रोजी १५४ वर पोहचली. मात्र १४ दिवसांपासून होम कॉरेंटाईन असलेल्या ४९ नागरिकांमध्ये कोणतेही लक्षणे नसल्यामुळे ते नागरिक आता होम कॉरेंटाईनच्या परिघाबाहेर आले आहेत.

**जिल्ह्यात होम कॉरेंटाईनची संख्या १०५**

मात्र पुढील दहा दिवस ते आरोग्य विभागाच्या देखरेखीखाली राहणार असून त्यांनी स्वत:च काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी एम.डी.सिंह तसेच आरोग्य विभागाने केले आहे. सध्या जिल्ह्यात १०५ जण होम कॉरेंटाईनच्या आहेत.

दि. २२ मार्च रोजी जिल्ह्यातील होम कॉरेंटाईन असलेल्यांची संख्या १५० होती. त्यात आज (दि. २३) रोजी चार जणांची भर पडली. त्यामुळे एकूण संख्या १५४ वर पोहचली. मात्र गत १४ दिवस होम कॉरेंटाईन असलेल्या ४९ नागरिकांना नियमित आरोग्य तपासीणअंती कोणतेही लक्षणे निदर्शनास आली नाहीत. हे सर्व ४९ नागरिक आता या परिघाबाहेर आले आहेत.

कोरोनाबाबत मोफत समुपदेशनकरीता जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाने ८६०५४६८५७८ आणि ९४२३६२१९७६ हा मोबाईल क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

स्व. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विलगीकरण कक्षात एकूण सहा जण दाखल असून यातील तीन जणांचे नमुने पॉझेटिव्ह आहेत. तर इतर तीन जण देखरेखीखाली आहेत. त्यांची प्रकृती स्थीर असल्याचे वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे यांनी सांगितले.

# अत्यावश्यक सेवा राहणार सुरू : जिल्हाधिकारी

## कलम १४४ अंतर्गत दिले आदेश

**यवतमाळ, दि २३ :** राज्यात कोरोना विषाणूमुळे (कोव्हीड - १९) उद्धवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) व (३) अन्वये जिल्हाधिकारी यांना प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून जिल्हादंडाधिकारी एम.डी. सिंह यांनी जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचाययती क्षेत्रात २३ मार्च २०२० च्या सकाळी ५ वाजतापासून दि. ३१ मार्चच्या मध्यरात्रीपर्यत आदेश पारीत केले आहे. या अंतर्गत अत्यावश्यक सेवा सुरू राहणार असल्याचे आदेशात म्हटले आहे.

या आदेशानुसार जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतीच्या क्षेत्रात खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र जमू नये. कोरोना विषाणुच्या अनुषंगाने कोणत्याही नागरिकाने समाजामध्ये अफवा, अपप्रचार व भीती निर्माण होईल, अशा प्रतिक्रिया व्हॉट्स?प, फेसबुक, ट्विटर, वृत्तपत्र, सोशल मिडीया व होर्डीग्ज आदीवर प्रसारीत करू नये. तसेच अधिकृत माध्यमाद्वारे माहिती न घेता दिशाभुल करणारी माहिती प्रसारमाध्यमावर प्रसारीत करूनये. कोरोना विषाणुचा अपप्रचार होईल या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे व्हीडीओ, फोटो प्रसारीत करून अफवा पसरवू नये. तसेच कोणत्याही विशेष प्रकारची महाआरती, समुहपठन, धर्मपरिषदांचे आयोजन करू नये. मिरवणुका, रॅली, सामुहिक कार्यक्रम, भाषणबाजी यांना या आदेशान्वये प्रतिबंध घालण्यात येत आहे.



सर्व प्रकारची धार्मिक स्थळे, प्रार्थनास्थळे यांनासुध्दा हा आदेश लागू राहील. प्रार्थना स्थळावर प्रार्थना , पुजाअर्चा सुरू राहील. पण अशी धार्मिक स्थळे भाविकांसाठी बंद राहतील. जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या ट्रॅव्हल्स, खाजगी बसेस व एस.टी. बसेस बंद राहतील. जीवनावश्यक व अत्यावश्यक कारणांसाठीच शहरांतर्गत बससेवा सुरू राहील. शासकीय कार्यालयात केवळ ५ टक्के कर्मचारी उपस्थित राहतील. किराणा, अन्न धान्य, फळे, भाजीपाला, दुध, दुग्धोत्पादने, औषधी व जीवनावश्यक वस्तुंची दुकाने, पेट्रोल पंप एजंन्सी सुरू राहतील. परंतु या ठिकाणी पाचपेक्षा जास्त लोक जमा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. बँक, वित्तीय संस्था सुरूच राहतील. तसेच ज्या नागरिकांचे घरीच विलगीकरण केले आहे व त्यांच्या हातावर शिक्के आहेत, त्यांनी १५ दिवस घराबाहेर पडू नये आणि घरातसुध्दा वेगळे रहावे. सर्व नागरिकांना अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहित कारणाशिवाय एकत्र येण्यास मनाई राहील. जिल्ह्यातील ग्रामीण भागात सदर आदेश लागू नसले तरी खबरदारीची उपाययोजना म्हणून ग्रामीण भागात कुठेही नागरिकांनी अजिबात गर्दी करूनये.

या आदेशामध्ये परिस्थितीनुरुप व शासनाच्या आदेशानुरुप आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांना राहतील. हे आदेश खालील बाबतील लागू होणार नाही.

अंत्यविधी, पोस्ट ऑफिसेस, दूरध्वनी, दूरसंचार व इंटरनेट सेवा देणारे कर्मचारी, पिण्याचे पाणी पुरवठा सेवा, विद्युत व उर्जा, पेट्रोलियम विभागाचे कर्मचारी इत्यादी. वैद्यकीय सुविधा (सर्व प्रकारचे दवाखाने, सर्व पॅथोलॉजी, लॅबोरेटरी), स्वच्छता विषयक सेवा, बँकींग सेवा व वित्तीय सेवा देणा-या संस्था, प्रसार माध्यमे (सर्व प्रकारचे दैनिक, नियतकालिके, टीव्ही न्युज चॅनल इत्यादी,) आयटी सेवा (जीवनावश्यक सेवा देण्यासाठी आवश्यक आय.टी.सेवा), तसेच उत्पादन करणा-या खाजगी युनीटमध्ये केवळ पाच टक्के मनुष्यबळ वापरून ही सेवा सुरू ठेवता येणार आहे. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणारे वाहने (ट्रक इत्यादी वाहने), अशा प्रकारच्या वाहनांना बोर्ड, कागदपत्रे सोबत असणे आवश्यक आहे. या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाने कळविले आहे.

खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना आदेश – जिल्ह्यातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहे.

खाजगी रुग्णालयातील बाह्यरुग्ण तपासणी सेवा पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात यावी. पूर्व नियोजित शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात यावी. आंतररुग्ण विभागातील सेवा तसेच अत्यावश्यक वैद्यकीय सेवा चालू राहतील. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने आवश्यकता भासल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ६५ चा वापर करून खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, त्यांचे अधिनस्त? कर्मचारी व इमारत आणि परिसर अधिग्रहीत करण्यात येऊ शकतो.

सदर आदेशाचे काटोकोरपणे पालन न केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ५१ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# हातला हत्याकांड : आरोपीचे वकीलपत्र न स्विकारण्याचे आवाहन:ॲड.प्रितम माळवे

**उमरखेड, दि २३ :** तालूक्यातील मुळावा नजीक असलेल्या शांतीनगर येथील गजानन विठ्ठल भुरके या नराधमाने मानूसकीला काळीमा फासवून एका निरागस बालीके सोबत कुकर्म करुन तीची अत्यंत निर्दयपणे हत्या केली. या प्रकरणाचा छडा लावल्यानंतर पोलीसांनी त्या नराधमाला बेडया ठोकल्या . ही घटना सामजिक दृष्टीकोणातून अत्यंत संतापजनक व घृणास्पद असल्याने उमरखेड न्यायालयातील कोणत्याही वकील बांधवाने सदर आरोपीचे वकील पत्र स्विकारू नये अशा आशयाचे निवेदन ॲड. प्रितम प्रेमानंद माळवे यानी उमरखेड बार असोशिएन अध्यक्ष यांना दिले आहे.

तालूक्यातील हातला येथील ८ वर्षीय शाळकरी मुलगी १२ मार्च रोजी अचानक पणे बेपत्ता झाली होती. दिवसभर त्या बालीकेचा शोध लागला नसल्याने सदर मुलीच्या वडीलाचे तक्रारी वरून पोफाळी पोलीस स्टेशन मध्ये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पोलीस अधिक्षक एम राजकूमार व अप्पर पोलीस अधिक्षक नुरूल हसन यांचे मार्गदर्शनात पोलीसांनी तपासचक्र गतीमान करून २० मार्च रोजी घटनेचा छडा लावला.

या घटनेमध्ये मुळावा नजीकच्या शांतीनगर येथील गजानन विठ्ठल भुरके ह्या नराधमाने सदर बालीकेचे अपहरण करून दुचाकीने तीला जंगलात नेवून तीचे सोबत वाईट कुकर्म करुन गळा आवळून खुन केल्याचे पोलीसांच्या तपासामध्ये निष्पन्न झाल्याने पोलीसांनी या नराधमाला बेड्या ठोकून पोलीस कोठडीत टाकले. पुढील न्यायालयीन खटल्यासाठी सदर नराधम आरोपीला वकील लावणे अनिवार्य आहे. सदर नराधम आरोपीने अत्यंत संतापजन व घृणास्पद कृत्य केल्याने व या घटनेचा निषेध म्हणून उमरखेड बार असोशियनच्या कोणत्याही सदश्याने सदर नराधम आरोपीचे वकील पत्र स्विकारु नये अशा आशयाचे निवेदन ॲड. प्रितम प्रेमानंद माळवे यांनी अध्यक्ष उमरखेड बार असोशियन यांना दिले आहे.

# वृत्तपत्रांसदर्भात सोशल मिडीयावर फिरणारा मॅसेज खोटा : जिल्हाधिकारी एम.डी सिंह

## जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल

**यवतमाळ,दि २३ :** प्रसारमाध्यमातून (प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक) कोरोना संदर्भातील खरी माहिती लोकांपर्यत पोहचिण्यास मोठी मदत होते. कोरोना व्हायरस संबधीत वृत्तपत्राबाबत खोटा मॅसेज पसरविणा-याविरुध्द जिल्हा माहिती अधिकारी यांच्या तक्रारीवरून पोलिस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी एम.डी.सिंह यांनी दिली.

कार्यालयीन कामकाज करीत असतांना जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर यांना व्हॉट्सप ग्रुपवर 'जिल्हाधिकारी यांच्या सुचना या अंतर्गत खोटा मॅसेज निदर्शनास आला. शिवाय या मॅसेजच्या खाली जिल्हा माहिती कार्यालय असे लिहिलेले आढळले. ही बाब जिल्हा माहिती अधिका-यांनी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून यात वृत्तपत्रासंदर्भात खोटी माहिती असल्याचे प्रशासनाला सांगितले. यावर तात्काळ कार्यवाही करून पोलिस स्टेशमध्ये तक्रार नोंदवा, असे आदेश जिल्हाधिका-यांनी दिले. त्यानुसार या संदर्भात शहर पोलिस स्टेशमध्ये अज्ञात व्यक्तिविरुध तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

वृत्तपत्रे स्वयंचलित मशीनवर तयार केली जातात. कोणत्याही मॅन्युअल टचशिवाय तसेच ग्लोव्हज आणि फेसमास्क घातलेल्या हॅंडलरद्वारे वर्तमानपत्रांच्या छापील गठ्ठे वाहून नेले जातात. वाचकांच्या घरी पाठवण्यापूर्वी वृत्तपत्र डेपोमध्ये हायजीन प्रोटोकॉलचे अनुसरण केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, घरांमध्ये वस्तूंच्या वितरणामध्ये दूषित होण्याचे प्रमाण अत्यंत कमी असते. अग्रगण्य विषाणूशास्त्रज्ञांसह प्रख्यात डॉक्टरांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, घरी वितरित केलेल्या वृत्तपत्रांचा संसर्ग होण्याचा धोका नाही. कोरोना विषाणू संसर्गबाबत जनजागृती करण्यासाठी तसेच आजारपणासंबंधीची सत्य माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी वृत्तपत्र हे विश्वासार्ह स्त्रोत आहे. त्यामुळे अफवा पसरविणा-या लोकांविरुध्द प्रशासनातर्फे कडक कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी एम. डी.सिंह यांनी सांगितले.

# यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूका ३ महिने लांबणीवर

**यवतमाळ,दि २३ :** कोरोनावर नियंत्रण आणण्यासाठी शासन स्तरावरून विविध अंबलबजावणी करण्यात येत आहे. कोरोणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कलम १४४ लागू करण्यात आली आहे. अत्यावश्यक सेवा वगळता जिल्हाभर लॉक डाऊन करण्यात आला आहे. ग्रामपंचायत निवडणूक सुध्दा निवडणूक आयोगाने पुढील आदेशास्थगित करण्यात आल्या असताना जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुका २६ मार्च ला वेळापत्रकानुसार होणार असल्याची जिल्ह्यात सर्वत्र चर्चा असताना त्याला तात्पुरती स्थगिती मिळाली आहे.

जिल्हा मध्यवर्ती निवडणुका ३ महिने समोर ढकलण्याचा आले आहे. हा महत्वपुर्ण निर्णय दिल्ली सर्वोच्च न्यायालयाने आज दुपारी दिला आहे.त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणुका संदर्भात राजकीय चर्चे ला आता ब्रेक लागला आहे.

# कोरोना विषाणु विरुद्धच्या लढाईचे लोकप्रतिनिधींनी नेतृत्व करावे : पालकमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे

बुलडाणा, दि. २३: सर्व लोक प्रतिनिधींनी शासन व प्रशासनामधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खांदयाला खांदा लावून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चालू असलेल्या लढाईत केवळ सक्रिय सहभाग न नोंदविता या ऐतिहासिक लढयाचे नेतृत्व करावे, असे आवाहन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केले आहे.

पालकमंत्री पुढे म्हणाले, विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन व प्रशासन युध्द पातळीवर प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. दिनांक २२ मार्च २०२० रोजी सकाळी ०७.०० वा. ते रात्री २१.०० वा. पर्यंत जिल्हातील सर्व नागरिकांनी 'जनता कर्फ्यु मध्ये जिल्हयातील नागरिकांनी ज्या सकारात्मक पध्दतीने व उत्साहाने सहभाग घेतला. त्याबददल सर्व जिल्हा वासियांचे मन:पूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करतो. राज्याचे मुख्यमंत्री यांच्या खंबीर नेतृत्वाखाली कोरोना विषाण विरुध्दचे युध्द जिंकण्यासाठी शासन व प्रशासनामार्फत व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. काल दिनांक २२ मार्च २०२० पासून संपूर्ण राज्यामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

मातृतीर्थ बुलडाणा जिल्हयामध्येही जिल्हादंडाधिकारी, बुलडाणा यांनी सदरचे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले असून जीवनाश्यक वस्तूंची दुकाने वगळता इतर सर्व दुकाने बंद करण्यात आली आहेत, आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे. ५ पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमू नये इत्यादी निर्देश देण्यात आले आहेत. परंतु, सदर प्रतिबंधात्मक आदेशाचे अनुपालन करण्यामध्ये बऱ्याच नागरिकांची उदासीनता व बेफिकीरी दिसून येत आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी गर्दी टाळण्याच्या महत्वाच्या बाबींकडे सर्व नागरिकांनी अत्यंत गांभीर्यपूर्वक वर्तन ठेवणे आवश्यक असल्याचेही पालकमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी नम्रपणे नमूद केले आहे.



आज दिनांक २३ मार्च २०२० रोजी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी वरिष्ठ अधिका-यांची व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे बैठक घेवून यासंदर्भात आढावा घेतला आहे. आंतरराज्य सिमा तसेच आंतरजिल्हा सिमा सिल करणे, सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी घालणे, सर्व धार्मिक प्रार्थना स्थळे नागरिक / भाविकांसाठी बंद करणे, जीवनावश्यक

अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची यादी सर्व समावेशक करुन त्या बाबतची कार्यपध्दती निश्चित करणे इत्यादी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहे. राज्य शासनाने एक महत्वपूर्ण निर्णय घेत संपूर्ण राज्यामध्ये दिनांक ३१ मार्च २०२० पावेतो लॉकडाऊन (डेल्ज्ञवेुप) जाहीर करण्यात आले आहे. कोरोना विषाणू विरुध्दचे युध्द जिंकण्यासाठी शासन व प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकाची अत्यंत महत्वाची भुमिका व जबाबदारी आहे. जनतेचे प्रतिनिधी म्हणून नगर परिषद, नगर पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद येथे निवडून आलेल्या लोक प्रतिनिधींनी या संदर्भात अधिक सकारात्मक भुमिका निभावणे आवश्यक आहे, असेही पालकमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी नमूद केले आहे.

पालकमंत्री पुढे नमूद करतात, की जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने मी सर्व नगर परिषदांचे नगरसेवक, सर्व पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य व ग्राम पंचायत सरपंच यांना आवाहन करतो की, सर्व लोक प्रतिनिधीनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घराबाहेर न पडण्याबाबत जनजागृती व प्रबोधन करावे. सर्व लोक प्रतिनिधींनी जीवनावश्यक अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची दुकाने कोठे आवश्यक आहेत ? त्याबाबतची योग्य ठिकाणे कोणती ? कोणत्या वाहनांमधून जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यात येणार आहे? याबाबतच्या नियोजनामध्ये सक्रिय सहभाग नोंदवून जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे.

तसेच पुणे, मुंबई व इतर ठिकाणी नोकरी व कामधंदयाकरीता जिल्हयातील अनेक नागरिक आपल्या मुळ गावी परत येत आहेत. अशा सर्व नागरिकांची कोरोना विषाणू संदर्भात वैद्यकीय तपासणी करण्यासाठी स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. बऱ्याच गावांमध्ये अशा नागरिकांना प्रवेश देण्याबद्दल स्थानिक लोक आक्षेप नोंदवित आहेत. यासाठी सर्व लोक प्रतिनिधींनी स्थानिक प्रशासना सोबत समन्वय साधून बाहेरून येणाऱ्या नागरिकाची वैद्यकीय तपासणी करण्याकडे लक्ष पुरवून ग्रामस्थांना आश्वस्थ करावे, असे आवाहनही पालकमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केले आहे.